अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे

# अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अॅन्ड रिसर्च

पर्वती, पुणे. ४११००९

---

## महाविद्यालय विकास समिती

## सभा दिनांक :– २९/०१/२०२१

## कार्यवृत्त

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अॅन्ड रिसर्च महाविद्यालय विकास समितीची सभा शुक्रवार, दिनांक २९/०१/२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे प्रशासकीय भवन, पर्वती, पुणे ४११००९ येथे आयोजित केली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. ॲड. भगवानराव बाबुराव साळुंखे | सभेचे अध्यक्ष, संयुक्त चिटणीस, अ.भा. म. शि. परिषद, पर्वती, पुणे. |
| २ | मा. सौ. प्रमिला भागवतराव गायकवाड | सरचिटणीस, अ.भा. म. शि. परिषद, पर्वती, पुणे. |
| ३ | मा. श्री. संदिप सुदामराव कदम | संयुक्त चिटणीस, अ.भा. म. शि. परिषद, पर्वती, पुणे. |
| ४ | मा. श्री. विजयसिंह यशवंतराव जेधे | खजिनदार, अ.भा. म. शि. परिषद, पर्वती, पुणे. |
| ५ | मा. श्री. धैर्यशील वसंतराव वंडेकर | सदस्य, महाविद्यालय विकास समिती |
| ६ | मा. डॉ. नवनाथ पासलकर | सदस्य, महाविद्यालय विकास समिती |
| ७ | डॉ. सुनिल भिमराव ठाकरे | सचिव / प्राचार्य |
| ८ | प्रा. गणेश एकनाथ कोंढाळकर | विभाग प्रमुख |
| ९ | प्रा. दत्तात्रय पाडुरंग कांबळे | शिक्षक प्रतिनीधी |
| १० | प्रा. शैलेश शिवाजी हजारे | शिक्षक प्रतिनीधी |
| ११ | प्रा. स्नेहल मोहन वीर | शिक्षक प्रतिनीधी |

सदर समितीचे अध्यक्ष मा. ना. श्री. अजितदादा अनंतराव पवार, संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. शशिकांत शंकरराव सुतार, यांनी उपस्थित राहू शकणार नसल्याचे कळविले. सभेने अनुपस्थितांची नोंद घेवून रजा मंजूर केली.

सदर सभेचे अध्यक्षपद मा. ॲड. श्री. भगवानराव बाबुराव साळुंखे यांनी भुषवावे अशी संस्थेच्या सरचिटणीस मा.सौ.प्रमिला गायकवाड यांनी विनंती केली व मा. श्री. विजयसिंह यशवंतराव जेधे, खजिनदार यांनी अनुमोदन दिले. सदर विनंतीस अनुसरून मा. ॲड. श्री. भगवानराव बाबुराव साळुंखे यांनी सदर सभेचे



Scanned with OKEN Scanner

अध्यक्षस्थान स्विकारले, सभेची वेळ व गणसंख्या पुर्ण झाल्याने अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

माजी राष्ट्रपती कै. प्रणव मुखर्जी, कोरोना काळात काम करताना निधन पावलेले डॉक्टर्स, पोलीस, इतर आरोग्य कर्मचारी, शहीद जवान, संस्थेचे सदस्य कै. बाळासाहेब जगताप व त्यांच्या पत्नी कै. मधुमालती जगताप, कै. बुवासाहेब जगताप, कै. दिलीप शिंदे, प्राचार्य कै. राजन गोवांडकर, प्रा. कै. अरविंद जगताप तसेच संस्थेच्या सभासदांचे निधन पावलेले स्नेही - आप्तेष्ट यांस श्रध्दांजलीचा ठराव मा. श्री. संदिप कदम, संयुक्त चिटणीस यांनी मांडला व त्यानुसार सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली वाहिली.

विषय क्र. १: मागील दि. १७/०७/२०१९ च्या सभेचे कार्यवृत्त मंजूर करणे.

ठराव क्र. १: मागील दि. १७/०७/२०१९ च्या सभेचे कार्यवृत्त सभासदांना पाठविले होते. तसेच सभेत केल्यानंतर सभेने कार्यवृत वाचून सभेने मंजूर केले.

विषय क्र. २: मागील दि. १७/०७/२०१९ च्या सभेतील ठरावाच्या कार्यवाहीची माहिती घेणे.

ठराव क्र.२ : मागील दि. १७/०७/२०१९ च्या सभेतील ठरावांपैकी विषय क्रमांक १६, १७ व १९ प्रलंबित याबाबतची माहिती सभेस देण्यात आली व त्या अनुषंगाने या सभेतील विषय क.१५,१७ व १९ निर्णय घेण्यात आला.

विषय क्र. ३: शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, अॅडजन्ट फॅकल्टी व इनोव्हेशन क सदस्य यांच्या नियुक्तीस मान्यता देणे.

ठराव क्र. ३: शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता विद्यापीठास अस्थायी स्वरुपाच्या १ वर्षाच्या शिक्षक मान्यते प्रस्ताव सादर करणे आवश्यक असतो. त्याअनषंगाने सदर शिक्षकांच्या मुलाखती घेणे आवश्यक ३ परंतू शैक्षणीक वर्ष २०२०-२१ मध्ये कोवीड १९ च्या प्रादुभावामुळे मुलाखती न घेता शैक्षणिक २०१९–२० मधील कार्यरत शिक्षक कर्मचारी यांच्या सेवेस संस्थेच्या दिनांक ०५.११.२०२० मान्यतेच्या पत्रानुसार दिनांक २ जुलै २०२० पासून व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना संस्थेच्या दिनांक जुलै २०२० च्या मान्यतेच्या पत्रानुसार दिनांक ५जून २०२० पासून मुदतवाढ दिलेल्या शिक्ष शिक्षकेत्तर कर्मचा-यांची यादी पुढीलप्रमाणे आहे. विद्यापीठाने कोव्हिड १९ च्या प्रार्दुभावामुळे शैक्ष वर्ष २०१९ -२० मधिल विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांस शैक्षणिक वर्ष २०२० -२१ साठी विद्य मान्यता दिली.

## शिक्षक कर्मचारी

| अ क्र. | नाव | पद | रूजू दिनांक |
|---|---|---|---|
| | | विभाग - कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | |
| १ | प्रा. अमित अशोकराव कदम | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| २ | प्रा. प्रणाली प्रकाश महाडिक | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| ३ | प्रा. सुहास रामदास कोठावले | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| | | विभाग - सिव्हिल इंजिनीअरिंग | |
| ४ | प्रा. अभय बाबुराव शेलार | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| ५ | प्रा. सचिन यादव | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| ६ | प्रा. सुमैय्या रफिक नाईकवाडी | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| ७ | प्रा. राकेश कुमार | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| ८ | प्रा. शितल पतगे | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| | | विभाग - मेकॅनिकल इंजिनीअरिंग | |
| ९ | प्रा. महेश प्रकाश कुंभारे | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १० | प्रा. आदित्य राजेंद्र वानखडे | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| ११ | प्रा. प्राजक्ता प्रल्हाद कचरे | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| | | विभाग - इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी | |
| १२ | प्रा. तेजश्री संदिप गायकवाड | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १३ | प्रा. सारंगकुमार शिवकुमार दुबे | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १४ | प्रा. बालाजी दंदे | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १५ | प्रा. अशोककुमार कलाल | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| | | विभाग - प्रथम वर्ष विभाग | |
| १६ | प्रा. सिध्देश्वर केकाण | इलेक्ट्रीकल -सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १७ | प्रा. राजेश खरात | मॅथेमॅटिक्स -सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १८ | प्रा. स्नेहल लोखंडे | मॅथेमॅटिक्स -सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |
| १९ | प्रा. दिंगवर पवार | ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी | ०२.०७.२०२० |
| | | मेकॅनिकल इंजिनीअरिंग — पदव्युत्तर पदवी विभाग | |
| २० | डॉ. काशीनाथ हरिभाऊ मुंडे | प्राध्यापक | ०२.०७.२०२० |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | प्रा. आशिष राजू पवार | सहाय्यक प्राध्यापक | ०२.०७.२०२० |

शै.वर्ष २०२०- २१ मध्ये राजीनामा दिलेल्या शिक्षकांच्या जागी खालील अस्थाई स्वरूपाच्या नेमणूका मा. जनरल सेक्रेटरी यांच्या परवानगीने करण्यात आल्या.

विभाग - कॉम्प्युटर इंजिनीअरिंग

| अ क्र. | नाव | पद | रूजू दिनांक |
|---|---|---|---|
| २२ | प्रा. अमोल शेणकर | सहाय्यक प्राध्यापक | २९.०९.२०२० |
| २३ | प्रा. निकीता गांधी | सहाय्यक प्राध्यापक | २८.१०.२०२० |

विभाग - सिव्हील इंजिनीअरिंग

| अ क्र. | नाव | पद | रूजू दिनांक |
|---|---|---|---|
| २४ | प्रा. शानभाग प्रज्ञा | सहाय्यक प्राध्यापक | ०९.११.२०२० |

विभाग - मेकॅनिकल इंजिनीअरिंग

| अ क्र. | नाव | पद | रूजू दिनांक |
|---|---|---|---|
| २५ | प्रा.धनश्री वारे | सहाय्यक प्राध्यापक | ०८.१०.२०२० |
| २६ | प्रा.शहारूख वेग | सहाय्यक प्राध्यापक | ०३.११.२०२० |

विभाग - ईलेक्ट्रानिक ॲण्ड टेलीकम्युनिकेशन इंजिनीअरिंग

| अ क्र. | नाव | पद | रूजू दिनांक |
|---|---|---|---|
| २७ | प्रा.भुषण भोक्से | सहाय्यक प्राध्यापक | १४.१०.२०२० |
| २८ | प्रा. सरिता हळदे | सहाय्यक प्राध्यापक | १४.१०.२०२० |

## शिक्षकेत्तर कर्मचारी

| अ.क्र. | नाव | विभाग | पद |
|---|---|---|---|
| १ | डॉ.नागनाथ वनसोडे | कार्यालय | कार्यालयीन अधिक्षक |
| २ | सौ. रूचा वावर | कार्यालय | लेखापाल |
| ३ | सौ.सारिका इंदलकर | कार्यालय | कनिष्ठ लिपीक |
| ४ | श्री.नितीन रणदिवे | कार्यालय | कनिष्ठ लिपीक |
| ५ | श्री.धनाजी शिंदे | कार्यालय | कनिष्ठ लिपीक |
| ६ | श्री.संकेत काळे | कार्यालय | कनिष्ठ लिपीक |
| ७ | श्री.सचिन भोरडे | ग्रंथालय | ग्रंथालय सहाय्यक |
| ८ | श्री.दिगंवर भावे | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | कार्यशाळा निर्देशक |
| ९ | श्री.भैया गायकवाड | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | कार्यशाळा निर्देशक |
| १० | श्री.समिर जागडे | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ११ | श्री.किशोर चांदगुडे | सिव्हील इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| १२ | श्री.सुधीर शिंगाडे | सिव्हील इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| १३ | सौ.स्वाती पाटील | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| १४ | सौ.शिला कुभांर | आय.टी.इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| १५ | कु.अस्मिता मुळीक | कार्यालय | शिपाई |
| १६ | श्री.महेश रेऊर | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | शिपाई |
| १७ | श्री. ईश्वर क्षिरसागर | सिव्हील इंजिनीअरिंग | शिपाई |
| १८ | श्री.विठ्ठल लोखंडे | ई.ॲण्ड टी. सी इंजिनीअरिंग | शिपाई |
| १९ | श्री.मंगेश पाटील | ग्रंथालय | शिपाई |
| २० | श्री.ऋषिकेश कदम | आय.टी.इंजिनीअरिंग | शिपाई |
| २१ | श्री.शाम उपकारे | | |
| २२ | सौ. अश्विनी भालेराव (रूजू दिनांक १६.१०.२०२०) | ई.ॲण्ड टी. सी इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक |
| २३ | श्री.अशितोष करंजे (रूजू दिनांक १९.१०.२०२०) | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | सिस्टीम ॲडमिन |
| २४ | सौ. आशा यादव (रूजू दिनांक १९.१०.२०२०) | कार्यालय | कनिष्ठ लिपीक |
| २५ | श्री. ओंकार ढमाले (रूजू दिनांक १९.१०.२०२०) | प्रथम वर्ष विभाग | इलेक्ट्रीशियन |

वरील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मच्या-यांच्या शै.वर्ष २०२०-२१ करिता नेमणूकीस सभेने मान्यता दिली.

## ॲडजन्ट फॅकल्टी

खालील प्राध्यापकांची शै.वर्ष २०२०-२१ करिता ॲडजन्ट फॅकल्टी म्हणून नेमणूक करण्याची शिफारस आहे.

| अ.क्र | नाव | विभाग | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतन प्रतिमाह रू. |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रदिप अवसरे | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | पी.एच.डी. (डिझाईन इंजि.) | शैक्षणिक ३० वर्ष औद्योगिक ०७ वर्ष | २५,०००/- |
| २. | प्रा.सुहास देशपांडे | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | एम.टेक (आय.आय.टी बॉम्बे) | ३७ वर्ष | २५,०००/- |
| ३. | डॉ. दशरथ पायगुडे | सिव्हिल इंजिनीअरिंग | पी.एच.डी. | ३९ वर्ष | १२,०००/- |
| ४. | डॉ. पदमाकर केळकर | ई.ॲन्ड टी.सी विभाग | पी.एच.डी. | शैक्षणिक ०१ वर्ष औद्योगिक ४३ वर्ष | २०,०००/- |

पुणे-९



Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | प्रा. प्रकाश कपिलेश्वर | सिव्हिल इंजिनीअरिंग | एम.ई. | ३० वर्ष | १५ ,000/- |
| ६. | डॉ. शैला सुब्वारमन | ई. ॲन्ड टी.सी विभाग | पी.एच.डी. | शैक्षणिक ३० वर्ष औद्योगिक १६ वर्ष | २५,000/- |

वरील ॲडजन्ट फॅकल्टी नेमणूकीस सभेने मान्यता दिली आहे.

विद्यार्थी व शिक्षक यांस नवनवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती अवगत करून देण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपुर्ण व उद्योजकतापुरक शैक्षणिक प्रकल्प करण्यास प्रोत्साहीत करण्याकरिता मा.डॉ.नवनाथ पासलकर, माजी संचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मुंबई याच्या मार्गदर्शनाखाली इनोव्हेशन क्लबची स्थापना करण्यात आली.

खालील निर्देशित इनोव्हेशन क्लब सदस्यांच्या professor Emeritus/मार्गदर्शक म्हणून शै.वर्ष २०२०-२१ करिताच्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | नाव | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतन प्रतिमाह रू. |
|---|---|---|---|---|
| १. | इंजि.अशोक सराफ (संस्थापक सायन्स आणि टेक्नॉलॉजी पार्क, पुणे) | एम.टेक (आय.आय.टी बॉम्बे) | ३० वर्ष | २0,000/- |
| २. | इंजि.सुर्दशन नातू | एम.टेक (आय.आय.टी बॉम्बे) | २० वर्ष | २० ,000/- |
| ३. | इंजि.अतूल मराठे | बी.टेक (आय.आय.टी बॉम्बे) | ३० वर्ष | २० ,000/- |
| ४. | इंजि.महोश वैद्य | एम.टेक (आय.आय.टी बॉम्बे) | ३२ वर्ष | २० ,000/- |
| ५. | इंजि.दिपक मोडक | एम .ई.इंजिनिअरिंग | ३० वर्ष | १५ ,000/- |

## मार्गदर्शक

| अ.क्र. | नाव | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वेतन प्रतिमाह रू. |
|---|---|---|---|---|
| ६. | डॉ. एस. एस. मंथा (माजी अध्यक्ष, AICTE,New Delhi) | पी.एच.डी. मेकॅनिकाल इंजिनिअरिंग | २५ वर्ष | तासिका तत्वावर मानधन व प्रवास खर्च. |
| ७. | प्रा. अशोक रानडे, न्युयॉर्क विद्यापीठ, टोरंटो ,कॅनडा | बी.टेक (एरॉनॉटीकल इंजि.), M.B.A | ३० वर्ष | तासिका तत्वावर मानधन व प्रवास खर्च. |



पुणे-९

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ४: आर्थिक वर्ष २०१९–२० च्या जमाखर्च व ताळेबंद पत्रकाची माहिती घेणे व मंजुरी देणेबाबत...

टिपणी : आर्थिक वर्ष २०१९–२० च्या जमाखर्च व ताळेबंद पत्रकाची माहिती खालील प्रमाणे सभेस देण्यात आली व त्यास सभेने मंजुरी दिली .

| Receipts | Amount (Rs.) | Payments | Amount (Rs) |
|---|---|---|---|
| To Opening Balance | 34,87,076.82 | By Salary Expenses | 4,08,42,869.00 |
| To Fees & Other Receipts | 4,38,56,399.00 | By Other Expenditures | 1,02,51,734.50 |
| To Bank Interest | 1,38,909,03 | By Fixed Assets | 6,30,784.00 |
| To Indirect Receipts | 17,17,342.00 | By Indirect Payments | 14,15,411.00 |
| To Other receipts | 6,11,25,647.25 | By Other Payments | 4,96,31,954.50 |
| To Inter Institutional | 81,170.80 | By Inter Institutional | 81,300.00 |
| | | By Closing Balence | 75,52,491.90 |
| **Total:-** | **11,04,06,544.90** | **Total:-** | **11,04,06,544.90** |

विषय क्र. ५: ३१ डिसेंबर २०२० पर्यंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या राजीनाम्यास मंजुरी देणेबाबत..

टिपणी : दि. ३१ डिसेंबर २०२० पर्यंत प्राप्त झालेल्या शिक्षक कर्मचारी यांचा राजीनाम्याचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र | प्राध्यापकांची नावे | विभाग | नियुक्ती प्रकार | पद | राजीनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा. राहुल दिवटे | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | स्थाई | सहाय्यक प्राध्यापक | २३/०७/२०१९ |
| २ | प्रा. योगेश देशमुख | सिव्हील इंजिनीअरिंग | स्थाई | सहाय्यक प्राध्यापक | १०/०१/२०२० |
| ३ | प्रा. विशाल मोमले | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | अस्थाई | सहाय्यक प्राध्यापक | ०६/०३/२०२० |
| ४ | प्रा. राकेश पाटील | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | अस्थाई | सहाय्यक प्राध्यापक | ०३/०७/२०२० |
| ५ | प्रा. मंदार काकडे | ई. ॲण्ड टी. सी इंजिनीअरिंग | स्थाई | सहाय्यक प्राध्यापक | २९/०८/२०२० |
| ६ | प्रा. महेश सापते | ई. ॲण्ड टी. सी इंजिनीअरिंग | अस्थाई | सहाय्यक प्राध्यापक | ०७/१०/२०२० |
| ७ | प्रा. मनोज मुळीक | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | स्थाई | सहाय्यक प्राध्यापक | १५/१०/२०२० |

पुणे-९



Scanned with OKEN Scanner

Name of the Institution
संस्थेचे नांव

# PROCEEDING BOOK

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | प्रा. आनंद शिलवंत | सिव्हील इंजिनीअरिंग | अस्थाई | सहाय्यक प्राध्यापक | २१/१०/२०२० |
| ९ | प्रा. बालाजी दंदे | आय टी इंजिनीअरिंग | अस्थाई | सहाय्यक प्राध्यापक | २०/०१/२०२१ |

- दि. ३१ डिसेंबर २०२० पर्यंत प्राप्त झालेल्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा राजीनाम्याचा तपशील :

| अ.क | नाव | विभाग | पद | राजीनामा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | उर्मिला शेळके | कॉम्प्युटर इंजिनीअरिंग | प्रयोगशाळा सहाय्यक | १४/१२/२०१९ |
| २ | विजय खडके | कार्यालय | कनिष्ठ लिपीक | ०७/०८/२०१९ |
| ३ | अनिल लोखंडे | प्रथम वर्ष विभाग | शिपाई | २१/११/२०१९ |
| ४ | कपिल परदेशी | मेकॅनिकल इंजिनीअरिंग | शिपाई | ०१/०८/२०२० |
| ५ | वैष्णवी ससाणे | कार्यालय | कनिष्ठ लिपीक | १९/०८/२०२० |

वरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या राजीनाम्या बाबत माहिती घेवून सभेने मंजुरी दिली.

विषय क्र. ६: शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयाला मिळणाऱ्या शिष्यवृत्ती बाबत माहिती घेणे.

ठराव क्र. ६ : शैक्षणिक वर्ष २०१९–२० अखेर महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त व प्रलंबित शिष्यवृत्तीचा गोषवारा खालीलप्रमाणे- विद्यार्थ्यींनी ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरलेल्या प्राप्त व प्रलंबित शिष्यवृत्तीचा तपशील:–

| अ.क्र. | संवर्ग | | एकूण विद्यार्थी | जमा झालेली रक्कम रू. | उर्वरित रक्कम रू. (शैं.वर्ष २०१९–२०) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ई.वी.सी | स्कॉलरशिप | २४७ | ६१,८४,०६९ | .... |
| २ | एस. टी. | स्कॉलरशिप | ०३ | १,७४,१०० | --- |
| | | फ्रीशिप | ०२ | १,०८,१६० | -- |
| ३ | एस.सी | स्कॉलरशिप | ३१ | १८,१३,८६० | -- |
| | | फ्रीशिप | २४ | ९,९६,९११ | .. |
| ४ | ओ.बी.सी | स्कॉलरशिप | ८८ | २०,१२,९७५ | ४,२५,००३ |
| | | फ्रीशिप | ४७ | ६,३३,११९ | ६,३३,११९ |
| ५ | एस.बी.सी | स्कॉलरशिप | १३ | ३,४३,७५६ | ३,६२,५२१ |
| | | फ्रीशिप | ५ | २,८२,८०५ | - |
| ६ | व्ही.जे. एन.टी. | स्कॉलरशिप | ४१ | १०,५३,०२६ | ५,५५,१७९ |
| | | फ्रीशिप | १३ | ३,५९,३२९ | ३,५९,३२९ |
| | | | ५१४ | १,३९,६२,११० | |
| | एकूण प्रलंबित रक्कम रु. | | | | २३,३५,१५१/– |



कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड रिसर्च पुणे-१

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये ऑफ लाईन पध्दतीने अर्ज भरलेल्या विद्यार्थ्या पैकी दोन विद्यार्थ्यींच्या प्रलंबित शिष्यवृत्तीचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ. क्र. | संवर्ग | | उर्वरित रक्कम रू. (शै. वर्ष २०१७–१८) |
|---|---|---|---|
| १ | एस.सी | स्कॉलरशिप | १,०७,४५१/– |
| | एकूण प्रलंबित रक्कम रु. | | १,०७,४५१/– |

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ ऑफ लाईन व शै. वर्ष २०१९–२० ऑन लाईन एकूण प्रलंबित रक्कम रु.

| अ. क्र. | वर्ष २०१७–१८ ऑफ लाईन | वर्ष २०१९–२० ऑन लाईन | उर्वरित एकूण रक्कम रु.. |
|---|---|---|---|
| १ | १,०७,४५१/– | २३,३५,१५१/– | २४,४२,६०२/– |

प्रलंवीत शिष्यवृत्तीची सभेने माहिती घेतली व संवधीत शासकीय विभागाकडे पाठपुरावा करण्या संदर्भात सुचना केल्या.

विषय क्र. ७: महाविद्यालयातील इनोव्हेशन क्लबच्या कार्याचा आढावा घेण्याबाबत...

टिपणी : डॉ. नवनाथ पासलकर ( माजी संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई) यांच्या मार्गदर्शनात इनोव्हेशन क्लब ची स्थापना करण्यात आली. त्यातील मान्यवर सदस्यांमार्फत खालील संशोधन प्रकल्प महाविद्यालयात राबवीत आहेत.

### १. <u>कृष्णा खोरे पूर आणि उपाय</u>

कृष्णा खो-यातील पूरावावत तज्ञांची निरिक्षणे व उपायावाबत संशोधन प्रस्ताव.

सांगली व कोल्हापूर परिस्थितीची मिमांसा व त्यावर उपायाकरिता संशोधन करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे व अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिग ॲन्ड रिसर्च पुणे येथील तज्ञ प्राध्यापकांनी दि.३०/०६/२०२० रोजी मा.मंत्री जलसंपदा व लाभक्षेत्र विकास,महाराष्ट्रशासन यांना मंत्रालयात मुंवई येथे सादरीकरण दिले. कृष्णा खो-यातील जलमार्गाचा नैसर्गिक प्रवाह,पूरशोषण क्षमता रिअल टाईम डेटा सिस्टीम मधील अचूकता, संर्पक जाळे व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग इ. अनेक वावींवर श्री. दिपक मोडक (मा. मुख्यअभियंता जलविद्युत प्रकल्प),प्राध्यापक सुधिर आगाशे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे व डॉ. पद्माकर केळकर इनोव्हेशन कल्व सदस्य यांनी आपली निरिक्षणे मांडली व सदर वावतीत संयुक्त संशोधन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने परवानगी व आर्थिक तरतुद करावी अशी विनंती करण्यात आली. सदर प्रक्रियेतील पुढील टप्यातील निर्णयासाठी पुणे येथे जलसंपदा विभागातील अधिकारी व कोल्हापूर - सांगली विभागातील नामांकीत अभियांत्रिकी महाविद्यालयांना वोलविण्याचे ना. जयंत पाटील यांनी सूचना दिल्या. सदरची बैठक अद्याप झालेली नाही यावावत महाविद्यालयातर्फे पाठपूरावा सूरू आहे.

अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड रिसर्च पुणे-९



Scanned with OKEN Scanner

## २ . हेड रेग्युलेटर या स्ट्रक्चरचे आधुनिकीकरण ः

येडगांव धरण कालव्यातील हेड रेग्युलेटरचे तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिकीकरण कण्याबाबत . महाविद्यालयाचे इनोव्हेशन कल्व सदस्य डॉ . पद्माकर केळकर यांना धरणातून कालव्यामध्ये सोडण्यात येणा-या पाण्याचा विसर्ग कायम स्वरूपी एकसारखा ठेवण्याची यंत्रणा विकसत करण्याचे पेटेंट प्रदान झालेले आहे . सदर तंत्रज्ञानाचा उपयोग करून जुन्नर तालूक्यातील येडगांव धरणाच्या कालव्यातील हेड रेग्युलेटरचे आधुनिकीकरण करून शेतीसाठीच्या आवर्तनाचा विसर्ग एकसारखा राहील व संबंधीत शेतकरी पाण्याचे व्यवस्थीत नियोजन करू शकतील . सदर तंत्रज्ञानामूळे धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यावर सुध्दा कालव्यातील विसर्ग एकसारखा ठेवता येईल .

आधुनिक पध्दतीचे सेन्सर व संगणकप्रणाली आपल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून सदर हेड रेग्युलेटर बसवण्याचा पथदर्शी प्रकल्प मा . मंत्री जलसंधारण महाराष्ट्र शासन यांना सादरीकरण करण्यासाठी वेळ मागीतली आहे . सदर बाबतीत पाठपूरावा सूरू आहे .

## ३ . सौर ऊर्जेवरील फिरती तुषार सिंचन प्रणाली .

महाविद्यालयातील इनोव्हेशन क्लब मेंबर डॉ . पद्माकर केळकर व प्राध्यापक यांनी मिळून शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जे वरील तुषार सिंचन प्रणाली विकसीत केली आहे . ही यंत्रण सौरऊर्जे व्दारे संपूर्ण क्षेत्रावर फिरत तुषार सिंचनाच्या माध्यमातून पाण्याची फवारणी करते . सदर यंत्रण गॅल्व्हनाईज पाईप पासून बनवली आहे त्यामूळे गंजण्याचा धोका नाही . यंत्रणा शेतात फिरण्यासाठी त्याला चाकांची सोय केली आहे . सौरऊर्जेसाठी टॉवरवर सोलर पॅनल बसविले आहे त्यातून ही उर्जा मोटारच्या माध्यमातून यंत्रणा आणि तुषार सिंचनाला पूरवली जाते . यंत्रणेची लांबी १९० ते २१० फूट व उंची ७२ ते ९० इंच असेल . ही यंत्रणा प्रयोगा दाखल राजगुरूनगर येथील राष्ट्रीय कांदा व लसून संचालनालयातील प्रक्षेत्रावर बसवण्यात आली असून या प्रयोगाचे निरीक्षण समाधानकारक आहे . राज्य सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठानी सदर यंत्रणेचा वापर करावा जेणे करून शेतक-यांना सदर यंत्रणेची माहीती होईल .

## ४ . स्मार्ट पॉलिहाऊस ः

संस्थेचे अध्यक्ष पदमविभूषण डॉ . शरदचंद्र पवार साहेब यांनी मे . जैन इरिगेशन जळगाव यांच्याकडून ३००० स्वे . फूट चे पॉलिहाऊस पुढिल संशोधनासाठी उभारून दिले आहे . महाविद्यालयातील इनेव्हेशन क्लब सदस्य श्री . अशोक सराफ, माजी संचालक सायंन्स आणि टेक्नॉलॉजी पार्क व इंजि . सुर्दशन नातू ( एम . टेक, आय . आय . टी बॉम्बे) )यांच्या मार्गदर्शनाखाली खालीलप्रमाणे तंत्रज्ञान विकसित करण्याचे काम महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी करीत आहेत .

- Computer Engineering & Information Technology Engineering चे प्राध्यापक कॉन्टीनीओ या सॉफ्टवेअर प्लॅटफार्मचा वापर करून पॉलिहाऊस मधील वेगवेगळया सेन्सरव्दारे उपलब्ध होणारी माहिती संगणकावर एकत्रित करून

अ. पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरींग बंड गार्डन पुणे-१ *



Scanned with OKEN Scanner

त्याचे विश्लेशण करून व तज्ञांचे मार्गदर्शन घेवून सदरची माहिती शेतक-यांच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्याविषयीचे तंत्रज्ञान विकसीत करत आहेत.

- Electronics & Tele Communication विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मातीतील ओलावा, आर्द्रता, तापमान इ. माहिती देणारे इलेक्ट्रानिक सेन्सर प्रणाली विकसीत करीत असून ती किफायती दरात शेतक-यांना उपलब्ध होईल. सदरची सर्व दैनंदिन माहिती कॉन्टीनीओ या सॉफ्टवेअरव्दारे संगणकावर साठवता येते.
- Mechanical Engineering विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी "ॲग्रोवॉट रोवोट" विकसीत करीत असून त्याव्दारे पॉलिहाऊस मधील पीक / रोपांचे फोटो घेणे, पिकांवर किटक नाशकांची फवारणी करणे इ. कामे शक्य होणार आहेत.
- या स्मार्ट पॉलीहाऊसमध्ये Internet of Things या तंत्रज्ञानाचा वापर करून ॲग्रोवॉट रोवोटने पाठविलेल्या पिकांच्या फोटोंचे विश्लेषण तंत्रज्ञानांच्या मदतीने करून पिकावरील रोग निदान, त्याची वाढ इ. विश्लेशण त्वरीत करता यईल व ऑनलाईन पध्दतीने तंज्ञांचे मार्गदर्शन घेता येईल. सदर वावतीत सकाळच्या ॲग्रोवन विभागाशी सामंजस्य कराराविषयी बोलणे सुरू आहे, जेणे करून ॲग्रोवनच्या सदस्य शेतक-यांना सदर तंत्र ज्ञानाविषयी माहिती उपलब्ध करून देता येईल.

## ५. JitsIndia APCOER Meet-

सद्यस्थितीत काळाची गरज पाहता मा. डॉ.एन.वी.पासलकर व इनोव्हेशन क्लव सदस्य प्रा.अशोक सराफ यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी JitsIndia APCOER या प्रकल्पाअंर्तगत **"APCOERMeet"** व्हिडिओ कॉन्फरन्सींग प्रणाली विकसित करत आहेत. सदर प्रकल्पासाठी लागणारे सर्व्हर मेसर्स ई वेबगुरू यांच्याकडून खरेदी केलेले असून या प्रणालीचे टेस्टींग महाविद्यालयात सुरू आहे. सदर प्रकल्प पुढिल ६ महिन्यामध्ये पुर्ण होत असून त्याव्दारे राज्यातील शेतक-यांना, विद्यार्थ्यांना विविध विषयावर ऑनलाईन सभेचे आयोजन करता येईल.

वरील सर्व प्रकल्पांची माहिती उपस्थित इनोव्हेशन क्लब सदस्यांनी सभेस दिली व सभेने त्या बावतीत इनोव्हेशन क्लव सदस्यांचे अभिनंदन केले तसेच शासनाकडे प्रस्तावीत असणा-या प्रकल्पावावत मा. ना. अजितदादा पवार, उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद यांचेकडे पुढिल मदतीसाठी सादर करण्यास सभेने सुचविले.

षय क्र. ८: अभियांत्रिकी महाविद्यालयास National Board Of Accreditation (NBA) ची मान्यता घेणे व त्याकरिता जेष्ठ प्राध्यापकांची नियुक्ती करण्यावावत ....

पणी : AICTE नवी दिल्ली यांच्या ३१ डिसेंबर २०१८ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेतील नियमानुसार सर्व व्यावसायीक अभ्यासकमाच्या महाविद्यालयास National Board of Accreditation (NBA) यांचेकडून पुढिल ४ वर्षात (२०२२ पुर्वी) मुल्यांकन करून घेणे आवश्यक आहे.

पुणे-१



Scanned with OKEN Scanner

N.B.A च्या Pre Qualifer मध्ये सहभागी होण्यासाठी पुढिल बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. प्रत्येक विभागात मागील २ वर्षासाठी पी.एच.डी. प्राप्त असलेले किमान एक नियमीत प्राध्यापक किंवा सहयोगी प्राध्यापक असणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक विभागातील मागील २ वर्षाच्या सरासरी एकूण शिक्षकांच्या १० % शिक्षक पी.एच.डी. प्राप्त असणे आवश्यक आहे.

सदर चर्चेदरम्यान डॉ.नवनाथ पासलकर, सदस्य महाविद्यालय विकास समिती यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये N.B.A मानांकन करिता आवश्यक प्राध्यापकांच्या नियुक्तीबाबत खालीलप्रमाणे सुचना केली.

१. शिक्षक भरती प्रकियेत उमेदवारांच्या मुलाखती घेण्याकरिता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (COEP)येथील तज्ञ प्राध्यापकांना निवड समितीत सामील करून शिक्षक भरती प्रकिया राबवावी.

२. उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेबरोबर त्यांचा शिक्षण व औद्योगीक क्षेत्रातील अनुभव तसेच विविध संशोधन प्रकल्पातील सहभाग ई. बाबींचा प्रामुख्याने विचार करावा जेणे करून

अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षण व संशोधनाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल.व उच्च गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी आकर्षीत करता येईल.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे N.B.A मानांकन AICTE नवी दिल्ली यांनी दिलेल्या मुदतीत करून घेण्याकरीता आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करण्यास सभेने मान्यता दिली.

विषय क्र. ९: महाविद्यालयास Artificial Intelligence and Data Science (AI&DS) हा नविन अभ्यासकम सुरू करण्याबाबत AICTE नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या मान्यतेबाबत माहिती घेणे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नीकरणाची माहिती घेणेबाबत...

ठराव क्र. ९ : महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२० - २१ पासून E &T.C Engineering विभागातील ३० जागा कमी करून Artificial Inteligence and Data Science या नविन अभ्यासकमाच्या ३० जागा मिळण्यासाठी AICTE नवी दिल्ली यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता, त्यास मा. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व डॉ. एन.बी. पासलकर यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या प्रयत्नांमुळे डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, चेअरमन, AICTE नवी दिल्ली यांनी विशेष बाब म्हणून महाविद्यालयास Artificial Intelligence and Data Science (AI&DS) हा नविन पदवी अभ्यासकम ३० विद्यार्थी क्षमतेसह मंजूर केला.

सदर अभ्यासकमास महाराष्ट्र शासन, Director of Technical Education मुबंई व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची मान्यता मिळालेली आहे. राज्यातील होतकरू मुलांना भविष्यात निर्माण होणा-या अत्याधुनीक तंत्रज्ञान अवगत करण्याची संधी यामुळे प्राप्त झाली आहे.

सदर नवीन अभ्यासकमाची माहिती सभेने घेतली व सदर अभ्यासकमास मंजुरी मिळविण्यासाठी प्रयत्न केल्याबाबत मा.ना.अजितदादा पवार व मा. डॉ. एन.बी. पासलकर यांचे आभार मानले व प्राचार्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे अभिनंदन केले.

विषय क्र. १० अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध अभ्यासकमांना शैक्षणिक वर्ष २०२०—२१ साठी AICTE नवी दिल्ली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी दिलेल्या मान्यतेची माहिती घेणेबाबत...



Scanned with OKEN Scanner

टिपणी : शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी AICTE नवी दिल्ली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी महाविद्यालयास खालील अभ्यासक्रमास विनाशर्त मान्यता दिलेली आहे. सदरची माहिती सभेस देण्यात आली.

**1. UG Courses**

| Sr.No. | Name of Course | Intake |
|---|---|---|
| 1. | Civil Engineering | 60 |
| 2. | Computer Engineering | 60 |
| 3. | Information Technology | 60 |
| 4. | E &T.C Engineering | 30 |
| 5. | Mechanical Engineering | 60 |
| 6. | Artificial Inteligence and Data Science | 30 |

**2. PG Courses**

| Sr.No. | Name of Course | Intake |
|---|---|---|
| 1. | Civil Enveironmental Engineering | 24 |
| 2. | Mechanical Design Engineering | 24 |

**2. B.Vocational Courses**

| Sr.No. | Name of Course | Intake |
|---|---|---|
| 1. | Automobile Servicing | 30 |
| 2. | Refrigeration & Air Conditioning | 30 |
| 3 | Software Development | 30 |
| 4 | Electronic Manufacturing Services | 30 |

विषय क्र. ११: महाविद्यालयात नविन संगणक (कॉम्पुटर)खरेदी करण्याबाबत ...

टिपणी : महाविद्यालयातील एकूण ४६३ कॉम्पुटर पैकी, सन २००८ व २०११ मध्ये खरेदी केलेले एकूण १३० कॉम्पुटर आहेत. सदर कॉम्पुटरमध्ये अदयावत प्रणाली नसल्यामुळे विद्यापीठाचे बदललेले अभ्यासक्रम शिकविणे अडचणीचे ठरत आहे. करिता महाविद्यालयात अदयावत प्रणालीचे नविन कॉम्पुटर खरेदी करणे आवश्यक असल्याचे सभेस शिफारस करण्यात आली. त्याअनुशंगाने सदर विषय मा. ना. अजितदादा पवार, उपाध्यक्ष, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद यांच्याशी चर्चा करून मदत मिळविण्याबाबत सभेने सुचविले.

विषय क्र. १२: Indian Maritime Institute यांचेमार्फत महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या जहाजांच्या संग्रहालय व गंथ्रालयाच्या माहितीबाबत...

टिपणी : इंडियन मॅरीटाईम इन्टीट्युट यांनी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद यांच्या पूर्व परवानगी ने अभियांत्रिकी महाविद्यालयात ग्रंथालय व जहाजांचे संग्रहालय सुरू केले आहे.त्यामध्ये विश्वविख्यात जहाजांच्या प्रतिकृती व पूरातन दस्ताऐवज विद्यार्थी व संशोधकांच्या अवलोकनार्थ ठेवले आहेत. तसेच इंडियन मॅरीटाईम इन्टीट्युटचे पदाधिकारी कॅप्टन श्री आनंद दिक्षीत व कमांडर अर्णाव दास यांच्या सहकार्याने विद्यार्थांना नौदल क्षेत्रात व पाण्याखालील संशोधन क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे.त्या दृष्टीने अभियांत्रिकी महाविद्यालय व इंडियन मॅरीटाईम इन्टीट्युट यांच्यामध्ये शैक्षणिक व संशोधन बाबतीत सांमजस्य करार करण्याची प्रकीया सुरू आहे.संस्थेने मान्यता दिल्यानंतर सदर करार व कार्यक्रम राबविता येतील.याबाबतची माहीती सभेने घेतली व मंजुरी दिली.



पुणे-९
Scanned with OKEN Scanner

विषय क्र. १३: महाविद्यालयामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्याकडे सादर केलेल्या विविध प्रस्तावाची माहिती घेणेबाबत.

ठराव क्र. १३: अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्याकडे सादर केलेल्या विविध प्रस्तावाची माहिती खालीलप्रमाणे सभेस देण्यात आली.

अभियांत्रिकी महाविद्यालयातील खालील प्राध्यापकांनी शै.वर्ष २०२० -२१ साठी संशोधन प्रस्ताव सादर केले आहेत.

## Rajiv Gandhi Science & Technology Commission, Mumbai

| Sr. no | Name of Principal Investigators &Co-Principal Investigators | Nameof Department | Title of propoal | Status | Amount in Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Prof.K.S Jetha<br>Prof.D.P.Joshi | Information Technology | Center of excellence in Blok –chain technology | Submitted | 48,50,000/- |
| 2 | Dr.K.H.Munde<br>Prof.G.E.Kondhalkar | Mechanical Engineering | Electric vehicle Development and Testing Lab | Submitted | 75,00,000/- |
| Total | | | | | 1,23,50,000/- |

## Science and Engineering Research Board, New Delhi.

| Sr.No | Name of Principal Investigators & Co-Principal Investigators | Name of Department | Title of propoal | Status | Amount in Rs |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr.K.H.Munde<br>Prof.G.E.Kondhalkar | Mechanical Engineering | Electric vehicle Development and Testing Lab | Submitted | 52,92,000/- |
| 2 | Dr. B.S.Selukar<br>Dr.G.S.Kamble | Applied Sciences | Study on Role of Ionic Liquide in Improving Electrical Properties of Polymer Nanocomposites for electronic applications | Submitted | 16,88,000/- |
| 3 | Dr.R.M.Kenvat | Applied Sciences | Some fixed point problems in different spaces and their applications | Submitted | 1,35,000/- |
| Total | | | | | **71,15,000/-** |

Scanned with OKEN Scanner

## Proposals Submitted for STTP to All India Council for Technical Education, New Delhi.

| Sr. No | Application Id | Title of the Proposal | Name of Coordinator | Cost of Proposal | Status |
|---|---|---|---|---|---|
